# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक १ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **मंगळवार दि. २३/०१/२०२४ सकाळी ११-०० वाजता स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्री. सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ५. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ६. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ७. | श्रीमती पल्लवी शिरसाठी | मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ८. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| ११. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| १३. | श्री. चंद्रकांत मोरे | प्र. लेखापाल |
| १४. | श्री. प्रकाश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| १५. | श्री. हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता |
| १६. | श्री. पी.डी. चव्हाण | सहाय्यक अभियंता |
| १७. | श्री. चंद्रकांत उगले | सहाय्यक अभियंता |
| १८. | श्री. अतुल पाटील | लिडींग फायरमन |

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** — आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

नगरसचिव — महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आदेश क्र. एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ च्या आदेशानुसार धुळे मनपाच्या प्रशासक पदी आयुक्त धुळे महानगरपालिका धुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनपा अधिनियमातील तरतूदीत कलम ४५२ अ

(१अ) व (१ब) च्या तरतूदीनुसार या ठिकाणी मा. आयुक्त महोदया आयुक्त तथा प्रशासक आज स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित आहे. मी त्यांचे प्रथम होणाऱ्या या बैठकीत स्वागत करतो.

म. प्रशासक — आपल्या सगळयांना माहिती की, आपल्या महानगरपालिकेची मुदत संपली त्यानंतर मुदत संपल्या नंतरची कारकीर्द सुरु होते ती कारकीर्द ३१ तारखेपासून सुरु झाली. त्यानंतर होणारी ही स्थायी समितीची पहिली सभा आहे. मनपाची महासभा आहे याच्या जो एक पायंडा आहे सभागृहामध्ये या बैठका होणे अपेक्षित आहे. त्याचाच एक भाग म्हणून अशा स्वरुपाची बैठक आपण घेतली आहे. इतर मनपामध्ये वेगळी पध्दत असेल परंतु आपल्याकडे रितसर अजेंडा निघतील आणि शक्यतो विषय असतील तर दर गुरवारी ही स्थायी समिती सभा होईल. किंवा इमर्जन्सी असेल तर आज मंगळवारी आहे तशी सभा घेऊ. आणि महिन्यातून १ महासभा घेण्याचा आपला प्रयत्न असेल. आपली महासभा पण येत्या गुरवारी होणार आहे. प्रयत्न हा असेल विषय अजेंडयावर येतील त्याच्या टिपन्या येतील. त्यावर प्रॉपर सभेमध्ये चर्चा होईल. यामागे हेतू हा आहे की, या निमित्ताने नागरिकांचे प्रश्न ,समस्या आपल्याला समजाव्या. यातून जे मनपाचे कामकाज सुरु आहे. ते कामकाज लोकांना उपलब्ध व्हावे. सभा झाल्यानंतर त्याचे होणारे ठराव असतील ते ठराव सुध्दा तातडीने लवकरात लवकर महानगरपालिकेच्या वेबसाईट त्यावर सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध् असतील. आज या सभेला उपस्थित असलेली माझी टीम अधिकारी गण, सभा कामकाज चालवणारे नगरसचिव, या सभेला उपस्थित असलेले सन्मा. काही नागरिक आणि सर्व प्रिंट आणि इलेट्रॉनिक मिडीया चे पत्रकार बंधू यापूर्वी नगरसेवक व्हीजीलन्स स्कॉड मधील लोक असायचे त्यांच्याकडून त्यांच्याभागातील काय चालू आहे ते बऱ्यापैकी कळायचे. ते आताही संपर्कात असतात पण कुठे काय चालले आहे हे आपल्या इतके कोणालाच माहिती असणार नाही. त्यामुळे इथून पुढे आमचे गाईड, मित्र असाल सर्व पत्रकार मित्रांचे स्वागत करते. सभेचे कामकाज सुरु करावे.

विषय क्रमांक:-०१ — स्थायी समिती सभा क्रमांक ३२ दि.२१/१२/२०२३ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता — इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात यावी.

म.मुख्यलेखाधिकारी — इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.प्रशासक — स्थायी समिती सभा क्रमांक ३२ दि.२१/१२/२०२३ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०१ दिनांक २३/०१/२०२४**

मागील स्थायी समिती सभा क्रं.३२ दिनांक २१/१२/२०२३ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर २१७ ते २२९ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२ — प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील श्री गजानन महाराज मंदिर येथे बगीचा बांधकाम, रस्ते, भिंत, पेव्हर ब्लॉक इ.सुशोभिकरण करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता सदर कामाची आपण ई निविदा दिली होती. सदरच्या कामासाठी शासनाने १००% निधी उपलब्ध करुन दिला आहे. यात मनपाचा हिस्सा राहत नाही. आणि ई निविदेमध्ये सर्वात कमी दराची गायत्री कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली आहे. आपण स्क्रुटिनी करुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे सदरची निविदा मंजूरीसाठी कलम ४५२ अ (१अ)व (१ब) नुसार स्थायीपुढे दर मंजूरीस्तव सादर केली आहे. यांची शिफारस करण्यात येत आहे.

म.अति.आयुक्त सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०२ दिनांक २३/०१/२०२४**

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील श्री.गजानन महाराज मंदिर येथील बगीचा बांधकाम/रस्ते/भिंत/पेव्हर ब्लॉक व सुशोभीकरण करणे. सन २०२३-२४ कामास शासन निर्णय क्र.TDS२०२३/०८/ प्र. क्र./३४६/पर्यटन दि.१०/११/२०२३ अन्वये १,२५,००,०००/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३८०/२०२३ दि.२३/११/२०२३ अन्वये रक्कम रु.१,२४,९८,१४०/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई-निविदा प्रक्रियेनुसार गायत्री कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १,२४,९८,१४०/-इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. सबब कंत्राटदार गायत्री कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव कलम ४५२अ (१अ) व (१ब) नुसार मे. स्थायी समितीपुढे दर मंजूरीस्तव शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३ धुळे मनपा मालकीचे आरोग्यवर्धीनीचे किरकोळ दुरूस्ती व देखभाल दुरूस्ती करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.आयुक्त डॉ. आपले आरोग्य वर्धीनीचे कामे काय स्टेजला आहे? तेही सांगावे. मंजूर १६ आरोग्यवर्धीनी त्याचे स्टेटस काय आणि हे जे काढले नव्याने काढले का?

म.आरोग्याधिकारी आपल्याकडे १६ आरोग्यवर्धीनी होत्या त्या पैकी ४ ते ५ चे रिनोव्हेशन बाकी आहे. त्या संबंधीत हा विषय आहे. ७ अजून आयडेंटीफाय व्हायच्या बाकी आहे.

म.आयुक्त त्याचे टारगेट नोव्हेंबर पर्यंत आहे.

म.अति. आयुक्त २२ होत्या पैंकी १६ केल्या ६ बाकी आहेत.

म. आरोग्याधिकारी टिपनी ठेवली आहे. आपले मनपाचे ५ दवाखाने तेथे करायचे आहे.

म.आयुक्त ऑन ॲन ॲव्हरेज किती पैसे हे दुरुस्तीला एका आरोग्यवर्धीनीसाठी ?

म. आरोग्याधिकारी २० लाख एका आरोग्यवर्धीनीसाठी. त्यात रिपेअर आणि रिनोव्हेशन या हेडमध्ये आहे

| | |
|---|---|
| म.आयुक्त | त्यासाठीच वापराल पण ६ जागा आयडेंटीफाय करुन आपल्याला त्याचे टारगेट नोव्हेंबर एंड होते. आता आपण जानेवारीमध्ये आहोत आपण जुन्या १६ वर काम करतोय. आणखी ६ राहिल्या त्यावर फोकस केला पाहिजे आपल्याला याचे प्लॅनिंग कसे कराल? |
| म. आरोग्याधिकारी | ५ जे मनपाचे दवाखाने आहे तेथे स्टाफ कमी आहे. एमओ नाही तेथे. पार्टटाईम एम ओ आहे त्यांना चार्ज दिला आहे. तेच ५ दवाखाने HWC मध्ये कनव्हर्ट केले त्यासाठी पूर्ण स्टाफ ही मिळेल आणि मेडीसिनही मिळेल. |
| म.आयुक्त | ५ नाही ६ करायचे आहे ना? |
| म. आरोग्याधिकारी | १ तर करुन घेऊ. ५ ते करतील. |
| म.आयुक्त | हे जे मंजूरीचे आले हे ६ चे इस्टीमेट करुन घ्यावे लागेल तुम्हाला. |
| म.अभियंता | यामध्ये आपल्याला या हेड खाली साधारणत: यापूर्वी २७ लाख ९६ हजार रुपये निधी होता. आजच्या दिवशी शिल्लक आहे. ६४ लाख ५६ हजार रुपयाची यामध्ये ३ ठिकाणी कामे आहे. जो रिपोर्ट आह त्याप्रमाणे बाळापूर, मोराणे, वरखेडी या तीन ठिकाणी कामे प्रस्तावित केली. |
| म.आयुक्त | या ३ झाल्यावर १६ पूर्ण होतात का तुमच्या? कधी पूर्ण होईल ? |
| म. अभियंता | हो साधारणत: महिनाभरात पूर्ण होईल. |
| म.आयुक्त | आपण वलवाडीला बघीतले विकसीत भारत संकल्प यात्रेच्या दिवशी ग्रामपंचायतचा वरचा मजला मोकळा आहे फक्त ग्रामपंचायतीचे दफ्त्र आहे तेथे. तेथील माजी नगरसेवकांचे म्हणने आहे तेथे चांगली ओपीडी चालते. रिस्पॉन्स चांगला आहे तेथे. आणि भिलाटीतील बायकांना डिलेव्हरीसाठी हिरे मेडीकलला जावे लागते. तेथे ४-५ बेडचे मॅटर्निटी होम उपलब्ध केले तरी काम भागणार आहे. तेही त्यात घ्यावे. |
| म. आरोग्याधिकारी | हो तेथे पण जागा भरपूर आहे. पण तेथे ग्रामपंचायतीचा रेकॉर्ड ठेवले आहे. आणि ते बंद अवस्थेत आहे. |
| म.आयुक्त | रेकॉर्ड काढून घेऊ. तुम्हाला एक सेंटर त्यातून घेता येईल् आपल्याला तेथील दवाखाना HWC म्हणून ट्रीट करायचा आहे. रिनोव्हेशन साठी कमी खर्च लागेल. बेड आणि बाकी गोष्टी तेथे अरेंज कराव्या लागतील. तुम्हाला आणखी ठिकाणी भेटली तर ठीक हे आहे ३ ते पूर्ण करा. पुढच्या महिन्याचे टारगेट असेल ते ६ च्या ६ आयडेंटीफाय करुन बांधकाम कडून इस्टीमेट घेऊन. टेंडर होऊन स्थायीपुढे मंजूरीला आले पाहिजे. कारण मार्च एंड पर्यंत कोणी वाट पाहणार नाही. एकदा आचारसंहिता लागली तर ही कामे राहून जातील. फेब्रुवारी हा एकच महिना आहे. कामासाठी १००% टारगेट पूर्ण होईल. |
| म.आरोग्याधिकारी | या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०३ दिनांक २३/०१/२०२४**

१५ वित्त आयोग या लेखाशिर्षा अंतर्गत धुळे मनपा आरोग्य वर्धिनीचे किरकोळ दुरुस्ती व देखभाल करणे. सन २०२३-२४ कामास मा.आयुक्त सो. यांच्या मंजुर दि.३०/११/२०२३ अन्वये ३९,५५,३३६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४०२/२०२३ दि.०१/१२/२०२३ अन्वये रक्कम रु. ३९,५५,३३६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई-निविदा प्रक्रियेनुसार सुर्यकांत दिपक महाले यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३९,५५,३३६/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. सबब कंत्राटदार सुर्यकांत दिपक महाले यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव कलम ४५२ अ (१अ) व (१ब) नुसार मे. स्थायी समितीपुढे दर मंजुरीस्तव शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४ — महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सेवा-सुविधांच्या विकास या लेखाशिर्ष (२२१७०९१३) (सन २०२२-२३ ) १ ते ६ रस्त्यांचे कॉक्रीटीकरण कामे करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता — मुलभूत सोई सुविधा अंतर्गत हेड क्र. २२१७०९१३ यामध्ये १००% अनुदान उपलब्ध झाले आहे. मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी प्रशासकीय मान्यता पण दिली आहे. त्यामध्ये इंद्रप्रस्थ कॉलनी रस्ते कॉंक्रीट करणे २४ लाख, गणेश नगर येथे रस्ते कॉंक्रीट करणे २४ लाख ९० हजार, इंद्रायणी कॉलनी परसिर रस्ते कॉंक्रीट करणे २४ लाख ९६ हजार, एकविरानगर भागत रस्ते कॉंक्रीट करणे २४ लाख ९३ हजार, ओम नगर येथे रस्ते कॉंक्रीट करणे २४ लाख ९४ हजार , आधार नगर येथे रस्ते कॉंक्रीट करणे २४ लाख ९५ हजार असे सर्व एकूण १ कोटी ४९ लाखाची कामाची ई निविदा आपण प्रसिध्द केली होती. सर्वात कमी दराची भूषण चौधरी यांची प्राप्त झाली आहे. अंदाजपत्रकीय दराने असल्याने कलम ४५२ अ (१अ) व (१ब)नुसार स्थायीपुढे मंजूरीसाठी शिफारस केली आहे.

म.आयुक्त — याच्या सर्व ऑर्डरचा विषय पेंडींग आहे आपला आधीच्या प्रकरणातल्या

म.अभियंता — हो आज जवळजवळ ४ प्रकरणांवर सह्या केल्या ४ प्रकरणे मंजूरीसाठी येत आहे. पुढच्या गुरुवारी पर्यंत होईल.

म. आयुक्त — निधी उपलब्धते बद्दल बघून घ्या नाईक मॅडमांशी बोलून घ्या. कारण कलेक्टर साहेबांचा कंसर्न असा आहे की, वर्क ऑर्डर दिल्या आणि पैसे १० कोटीच्या अगेन्स्ट २५ लाख आले. बाकी कामांची जबाबदारी पैसे नाही आले तर काय करणार ?

म.अभियंता — करारनाम्यात पण तशी अट टाकू शासनाचा निधी उपलब्ध होईल. त्याप्रमाणे देयक अदा करण्यात येईल. व्याज वगैरे वगळता येणार नाही. कोर्टात जाता येणार नाही. प्रस्तावाची शिफारस करण्यात येत आहे.

म. आयुक्त — वर्क ऑर्डर प्रोसेस करुन टाका. आचार संहितेच्या आधी प्रोसेस करुन घ्या. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०४ दिनांक २३/०१/२०२४**

मुलभुत सोयी सुविधा विकास योजने अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधा विकासा अंतर्गत १ ते ६ कामे कॉंक्रीटीकरण करणे. सन २०२३-२४ कामास मा.जिल्हाधिकारी

सो. यांचे जा.क्र.१२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/ १३१९/२०२३ दि.२०/११/२०२३ अन्वये १,४९,६१,०८१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./७ ते १२ /२०२३ दि.०३/०५/२०२३ अन्वये रक्कम रु. १,४९,६१,०८१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई-निविदा प्रक्रियेनुसार भुषण एल. चौधरी यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु. १,४९,६१,०८१/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. सबब कंत्राटदार भुषण एल. चौधरी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव कलम ४५२अ (१अ) व (१ब) नुसार मे.स्थायी समितीपुढे दर मंजुरीस्तव शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-५ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्था.विकास योजना अंतर्गत प्र.क्र.१ मध्ये प्रबुध्द कॉलनी भूमापन क्र.१७/२ ब येथे विपश्यना केंद्र बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | यामध्ये १००% अनुदान मिळाले आहे. त्याप्रमाणे आपण ई निविदा केली होती. ई निविदेत सर्वात कमी दराची निविदा साजिद अली शाह यांची आहे अंदाजपत्रकीय दराने आली आहे. कलम ४५२ अ (१अ) व (१ब)नुसार स्थायीपुढे मंजूरीसाठी शिफारस केली आहे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०५ दिनांक २३/०१/२०२४**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.०१ मध्ये प्रबुध्द कॉलनी भुमापन क्र.१७/२ब येथे विपश्यना केंद्र बांधणे. सन २०२३-२४ कामास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्र.सआसकधु/सामाजिक विकास/प्रशासकिय मान्यता/२०२३-२४/३२७२दि.०२/११/२०२३ अन्वये ४९,९९,२५६/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२५३/२०२३ दि.२८/०९/२०२३ अन्वये रक्कम रु. ४९,९९,२५६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई-निविदा प्रक्रियेनुसार साजिद अली शहा यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु. ४९,९९,२५६/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. सबब कंत्राटदार साजिद अली शहा यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव कलम ४५२अ (१अ) व (१ब) नुसार मे.स्थायी समितीपुढे दर मंजुरीस्तव शहर अभियंता यांनी

प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-६ | मूलभूत सेवा-सुविधा विकास कामे अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये सर्व्हे नं.४०४ मधील खुल्या जागेस वॉल कंपाऊड करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | यामध्ये १००% अनुदान मिळाले आहे. त्याप्रमाणे आपण ई निविदा केली होती. ई निविदेत सर्वात कमी दराची निविदा ए के सैफी यांची आहे अंदाजपत्रकीय दराने आली आहे. कलम ४५२ अ (१अ) व (१ब)नुसार स्थायीपुढे मंजूरीसाठी शिफारस केली आहे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०६ दिनांक २३/०१/२०२४**

मुलभुत सोयी सुविधा विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.१९ मध्ये सर्व्हे नं.४०४ मधील खुल्या जागेत वॉल कंपाऊंड करणे. सन २०२३-२४ कामास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्र.१२/क/कक्ष-५/ नपाप्र/बांध/१०९१/२०२३ दि.०७/०९/२०२३ अन्वये ९९,९९,६५४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२१/२०२३ दि.२२/०५/२०२३ अन्वये रक्कम रु. ९९,९९,६५४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई-निविदा प्रक्रियेनुसार ए.के. सैफी यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु.९९,९९,६५४/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ए.के. सैफी यांचे न्यूनतम दर अंदाजपत्रकीय दराने आहे सबब कंत्राटदार ए.के. सैफी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव कलम ४५२अ (१अ) व (१ब) नुसार मे.स्थायी समितीपुढे दर मंजुरीस्तव शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-७ | मूलभूत सेवा-सुविधा अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये अविष्कार कॉलनी येथील चाळीसगांव रोड ते मदरसा अल बाकी यानूस स्वालीयात पर्यंत गटार करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | यामध्ये १००% अनुदान मिळाले आहे. त्याप्रमाणे आपण ई निविदा केली होती. ई निविदेत सर्वात कमी दराची निविदा शाहिद अंजुम शकील अहमद यांची आहे अंदाजपत्रकीय दराने आली आहे. कलम ४५२ अ (१अ) व (१ब)नुसार स्थायीपुढे मंजूरीसाठी शिफारस केली आहे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०७ दिनांक २३/०१/२०२४**

मुलभुत सोयी सुविधा विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.१९ मध्ये अविष्कार कॉलनी येथे चाळीसगांव रोड ते मदरसा अल बाकीयातूस स्वालीहात पर्यत गटार करणे व अविष्कार कॉलनी गल्ली नं.१ येथे काँक्रीटी रस्ता करणे. सन २०२३-२४ कामास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्र.१२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०९१/२०२३ दि.०७/०९/२०२३ अन्वये ४९,९९,१८७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४८/२०२३ दि.०४/०७/२०२३ अन्वये रक्कम रु. **४९,९९,१८७/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **शाहिद अंजुम शकील अहमद** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **रु. ४९,९९,१८७/-** इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. सबब कंत्राटदार **शाहिद अंजुम शकील अहमद** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव कलम ४५२अ (१अ) व (१ब) नुसार मे. स्थायी समितीपुढे दर मंजुरीस्तव शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-८ | धुळे महानगरपालिका आरोग्यविभागाकडील न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन क्र एम.एच.१८ बी.आर.१५४२ वाहन दुरूस्ती खर्च ₹.२०,९११/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवाल सादर केलेला असून प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०८ दिनांक २३/०१/२०२४**

धुळे महानगरपालिका धुळे आरोग्य विभागा-कडील अत्यावश्यक सेवेतील बॅक हो लोडर मशिन क्रं. वाहन एम.एच.१८ बी.आर.१५४२ मशिनचे ऑपरेटर व प्रमुख स्वच्छता

निरीक्षक यांचे अहवालानुसार जेसीबी मशिनाचे ७१५२ किमी तास झाले असून व मशिन व्यवस्थीत रीत्या काम करीत नसल्यामुळे कामात अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे मशिनची नियमित सर्व्हीसींग करणे गरजेचे आहे. त्यानुसार अधिकृत वितरक, केस कन्स्ट्रक्शन, गुलाटी क्रेन्स, नाशिक. यांना पत्र देऊन कंपनी अभियंता मार्फत वाहनांची तपासणी करून इस्टिमेट देण्याचे करावे त्यानुसार रक्कम रू.२०९११/- दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षांत खर्च रू.१,७८,७०८/- मात्र आजपावेतो खर्च झालेला आहे या बिलातील खर्च रू.२०,९११/- आहे असे एकुण चालु आर्थिक वर्षात ₹.१,९९,६१९/-मात्र खर्च होणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम तरतुदनुसार सदर खर्च रक्कम ₹.२०,९११/- मात्रला मा.आयुक्त सो.यांना मंजुरीचे अधिकार आहेत. याबाबत विभागाने प्रस्ताव सादर केलेला आहे.त्यानुसार धुळे महानगरपालिका आरोग्यविभागाकडील न्यु हॉलंड बॅक हो लोडर मशिन क्र एम.एच.१८ बी.आर.१५४२ वाहन दुरूस्ती खर्च ₹.२०,९११/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-९ | धुळे महानगरपालिका सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशामक) विभागाकडील वाहन क्र.एम.एच.१८जी.०२५९ अग्निशामक वाहन पंप दुरूस्ती खर्च ₹.४५,८०६/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवाल सादर केलेला असून प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ०९ दिनांक २३/०१/२०२४**

धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागा-कडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन एम.एच.१८ जी.०२५९ वाहनांचे वाहनचालक,व सहा.अग्निशमन अधिकारी यांचे अहवालानुसार वाहन मुस्लीम समाजाच्या इस्तेमा कार्यक्रमासाठी बंदोबस्त कामी उभे ठेवण्यात आले होते सदर कार्यक्रमस्थळी वाहन तपासणी केली असता वाहनाचा पि.टी.ओ पडत नसल्याने समजले अहवालनुसार सदरील वाहन हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने वाहनांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याशिवाय वाहन योग्यरित्या कार्यरत होऊ शकत नाही. त्यामुळे अधिकृत वितरक- फायरफ्लाय फायर पंप प्रा.लि. कोल्हापुर त्यांचे अभियंतामार्फत वाहनांची तपासणी करून एस्टिमेट घेण्यात आले त्यानुसार खालील दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे.सदर करण्यात येणारी दुरूस्ती रक्कम रू.४५८०६/- खर्च येणार आहे. सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षांत खर्च रू.९७,१४०/- मात्र आजपावेतो खर्च

झालेला आहे या बिलातील खर्च रू.४५,८०६/- आहे असे एकुण चालु आर्थिक वर्षात ₹.१,४२,९४६/- मात्र खर्च होणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार खर्च रक्कम ₹.४५,८०६/- मात्रला मा. आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. याबाबत विभागाने प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिका सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशामक) विभागाकडील वाहन क्र.एम. एच.१८जी.०२५९ अग्निशामक वाहन पंप दुरूस्ती खर्च ₹.४५८०६/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१० धुळे महानगरपालिका कडील आरोग्य विभागाकडील ड्रेनेज आणि भुमिगत गटारी चोकप काढण्यासाठी साहित्य खरेदी करणेकामी रू.२,५७,०००/- झालेल्या खर्चास मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवाल सादर केलेला असून प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.अति.आयुक्त सदर प्रस्तवास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तवास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक १० दिनांक २३/०१/२०२४**

धुळे महानगरपालिका कडील आरोग्य विभागा कडील ड्रेनेज आणि भुमिगत गटारी चोकप काढण्यासाठी साहित्य मिळणे बाबत मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी लेखी मागणी पत्र भांडार विभागा कडेस सादर केलेले आहे.

सदरचे साहित्य तातडीने असल्याने त्वरीत साहित्य उपलब्ध करुन घ्यावी लागणार असुन सदरचे साहित्य स्थानिक सेवा धारक मे.सचिन एस.कोडगीर यांचे कडुन करुन घेऊन मा.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेण्यास सादर करणेस येणार आहे.

तरी सदरचे सेवा धारक कडुन खालील प्रमाणे काम करुन घेण्यात आलेले असुन त्यांचे कडील बिला प्रमाणे त्यांनी एकूण २,५७,०००/- खर्च सादर केलेला आहे. याबाबत विभागाने प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकाकडील आरोग्य विभागाकडील ड्रेनेज आणि भुमिग गटारी चोकप काढण्यासाठी साहित्य खरेदी करणेकामी रू.2,57,000/- झालेल्या खर्चास कार्यात्तर मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-११ धुळे महानगरपालिका कडील चतुर्थ श्रेणी (पुरुष) कर्मचारी यांना कापडी गणवेश एक पॅन्ट व एक शर्ट मटेरियल शिलाई करणेकामी रू.२,६५,४४०/-झालेल्या खर्चास मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता सदर प्रस्तावाबाबत कार्यालयीन अहवाल सादर केलेला असून प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.अति.आयुक्त सदर प्रस्तवास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तवास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ११ दिनांक २३/०१/२०२४**

धुळे महानगरपालिका कडील चतुर्थ श्रेणी (पुरुष) कर्मचारी यांना कापडी गणवेश एक पॅन्ट व एक शर्ट मटेरियल शिलाई करुन पुरविणे बाबत मा.आयुक्त सो यांनी सुचित केले आहे.

सदरचे सेवा तातडीने असल्याने त्वरीत सेवा उपलब्ध करुन घ्यावी लागणार असुन सदरचे सेवा स्थानिक सेवा धारक मे.सचिन एस.कोडगीर यांचे कडुन करुन घेण्यात आलेले आहे. त्यांचे कडील बिला प्रमाणे त्यांनी एकूण रक्कम रू.२,६५,४४०/- खर्च सादर करण्यात आलेला आहे. याबाबत विभागाने प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकाकडील चतुर्थ श्रेणी(पुरूष) कर्मचारी यांना कापडी गणवेश एक पॅन्ट व एक शर्ट मटेरियल शिलाई करणेकामी रू.2,65,440/- झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१२ धुळे महानगरपालिकेची Credit reating करणेसाठी संस्था नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.आयुक्त लेखा अधिकारी गजानन पाटील आले का? आजच्या बैठकीला जे विभागप्रमुख नसतील ती उपस्थिती चेक करुन घ्यावी.

म.सहा. अभियंता क्रेडीट रेटींग करण्याबाबत शासनाने आदेशित केले होते. मनपाची पत कशी आहे कळण्यास सुलभ होणार आहे. तसेच राष्ट्रीयकृत बँकांना व शासनाला आपल्याला अनुदान देण्यासाठी व शासनाच्या योजनांच्या मंजूरी मिळण्यास सुलभ होणार आहे. या २ वर्षात १५१४ कोटी रुपयांच्या योजना मंजूर झाल्या आहे. त्यापैकी अमृत १ मध्ये अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना १६९ कोटी, अमृत १ मध्ये मल:निस्सारण योजना १३१ कोटी, अमृत १ मध्ये सुधारित पाणी पुरवठा योजना ८.४७ कोटी, अमृत १ मध्ये ८५.६ कोटी, राज्यस्तरीय नगरोत्थान योजना ३०१.८९ कोटी, अमृत २ मध्ये हद्दवाढीसाठी सह पाणीपुरवठा योजना त्यासाठी १४२.७६ कोटी, अमृत २ मध्ये प्रस्तावित मल:निस्सारण टप्पा २ मध्ये ७१४ अशा एकूण ७ योजनांद्वारे १५१४ कोटींच्या योजना मंजूर झाल्या आहे. आणि पहिल्या २ वर्षात कार्यादेश देऊन हे कामे कंम्प्लीट करावे लागणार आहे. त्यासाठी आपल्या मनपाचा हिस्सा ३४६.६२ कोटीचा हिस्सा मनपाला

देय आहे. यासाठी मागील महासभेत ठराव केला होता. अर्थ सहाय्य अनुदान केंद्र शासनाची योजना यात ही क्रेडीट रेटींग करण्यासाठी भारत सरकारची एक कंपनी होती. या कंपनीचे १८ हजार कंपन्यांची क्रेडीट रेटींग केली आहे. त्यामुळे ही शासनाकडे नोंदणीकृत कंपनी असल्यामुळे रेट मागवले होते. १८ लाख रुपयाचे रेट त्यांनी आपल्याला कळवले होते. याबाबत मा. आयुक्तांशी निगोशिएशन करुन कंपनीने काम करण्यास संमती दर्शविली आहे. त्यानुसार हा विषय आपण कलम ४५२ १(अ) व १ (ब) नुसार स्थायी पुढे निर्णयाकरीता ठेवले आहे.

म.आयुक्त — या सोबत सगळयात महत्वाचे पाणीपुरवठा व बांधकाम विभाग या दोन विभागाच्या मेजर योजना आहे. किंवा मागील महासभेत केंद्राची केंद्रीय अर्थसहाय्य योजना होती त्या सगळया केंद्रांच्या योजनांचा पण त्याला तुमच्या युएलबी चे क्रेडीट रेटींग महत्वाचे आहे. ते क्रेडीट रेटींग करुन घेतले तर सहाय्य मिळू शकते. मुन्फ्रा चे UIDSSMT मध्ये आपल्याला त्याचे शेअर मिळाले तेव्हापण क्रेडीट रेटींग चा विषय तेव्हाही होता. आणि हे क्रेडीट रेटींग १ वर्षासाठी लागू राहते. पुन्हा पुढच्या वर्षी ते अपडेट करुन घ्यावे लागते. अमृत २ मध्ये जी.आर. खूप काळजीपूर्वक बघीतला असेल तर त्यात मँडेटरी प्रोव्हीजन अशी ठेवली की तुम्हाला जो शेअर उभा करायचा असेल तो उभा करतांना केंद्रा कडून मागाल किंवा मुन्फ्रा कडून घ्याल किंवा ओपन मार्केट बॉरोविंग कराल तेव्हा त्यासाठी क्रेडीट रेटींग महत्वाचे आहे. जो अमृत २ चा जी आर निघाला गॅप ॲनॅलिसिस सोबत सोबत हा पण जी आर निघाला. त्यात १ मुद्दा असा होता त्यांचा की तुम्ही जर हे क्रेडीट रेटींग करुन घेतले व तुम्ही पहिल्यांदा गॅप फंडींगसाठी केंद्राकडे अप्लाय केले तर १०० कोटीला १२ टक्के म्हणजे साधारण १०० कोटीला १२ कोटी रुपये अनुदान म्हणून देणार आहे. त्यासाठी तुम्ही वर्कआऊट करुन पटकन दिले तर ३०० कोटीचे बॉरोविंग असेल तर ३०० कोटीचे १२ टक्के म्हणजे जवळपास ५० कोटीच्या आसपास चे अनुदान किंवा इंसेंटिव्ह ग्रँण्डच्या स्वरुपात ते मिळेल अशी ती सिच्युएशन आहे. पहिले १०० पहिले २०० ULB ला ते लागू करणार आहे. त्यामुळे हे सर्व त्वरीत करुन आपले प्रपोजल गेले तर केंद्राकडे या संदर्भातले क्रेडीट रेटींग करुन केंद्र अर्थसहाय्य योजनेमध्ये शेअरसाठी गॅप फंडींगच्या त्यामुळे तुम्हाला तेवढे अनुदान मिळू शकते. हे लवकर करुन घ्यावे हा जरी ११.८९ चा रेट दिलेला असला त्यांना अजून निगोसिएशन करु शकतात का त्याबाबत पत्र ठरावासोबत त्यांच्याशी पत्रव्यवहार करायचा आणि पुढील प्रोसेस करायची.

म.अभियंता — मॅडम यात विनंती आहे की, हे सगळे कामे करण्यासाठी या कंपनीला डाटा उपलब्ध करुन द्यावा. लागेल त्यानंतर ते कार्यवाही करु शकतील त्यासाठी चव्हाण साहेब यांना नोडल ऑफिसर व त्यांच्या हाताखाली अटलानी अकौंट विभागाचे व बांधकाम विभागाचे थोरात यांची जर ऑर्डर केली तर काम मार्गी लागेल.

म.आयुक्त — मागचा डबल एन्ट्रीचा अनुभव बघीतला मी दिड वर्षे आपण ते डबल एन्ट्रीचे काम करत होतो. हे फार जिकरीचे आहे अटलानी, मोरे आणि तुम्ही पण यामध्ये लिड घ्या. साधारण बऱ्यापैकी गोष्टी निर्दशनास आल्या आहे. तर ते बघायला सोपे पडेल तुम्हाला आणि हे लवकरात लवकर मार्गी लागेल यावर काम करावे लागेल आपल्याला. डबल एन्ट्रीचा डेटा बऱ्यापैकी आपल्याकडे उपलब्ध आहे. तो फक्त काढून द्यायचा आहे. अटलानी आणि मोरे यांनी काम केले आहे. त्यांना अंदाज आहे काय करायचे त्याबाबत त्या हिशोबाने ते सर्व कंम्प्लीट करुन घ्या. म्हणजे तो विषय मार्गी लागेल. अजून काय आहे का महत्वाचे विषय ?

| | |
|---|---|
| म.अभियंता | दोन तीन गोष्टी होत्या मॅडम ब्लीचींग , ॲलमची बिले द्यायची बाकी होती. इलेक्ट्रीक वाल्याला विद्युत पथदिव्यांचे बिले अदा केलेली नाही. |
| म.आयुक्त | त्याबाबत गजानन पाटील यांना सांगावे. त्याची प्रोसेस करुन घ्या. शिरसाठ मॅडमांची अडचण कमी झाली सेक्रेटरी सरांचे पत्र आल्यावर आपल्याला तो एक रिलिफ मिळाला वसुलीचे जे गाडे ठप्प झाले होते ते मोबिलाईज व्हायला सुरवात होईल. आता मराठा आरक्षणाचे काम ३१ तारखेपर्यंत आहे. त्यानंतर टीम फॉर्म करुन म्हणजे प्रत्येक विभागातला कर्मचारी फिल्डवर असेल. त्याला एरिया वाटून दिला जाईल. तिथली वसुली त्यांनी करायची आणि अति. आयुक्त याचे टिम लिडर असतील. सर्वांना जबाबदारी दिली जाईल. त्यांना त्यात्या भागातील वसुली करायची. वसुली करायला नविन असेसमेंट ने काही फरक पडत नाही. नव्याने केलेली असेसमेंट आहे त्याची प्रोसिजर चालू आहे. त्याला स्कोप आहे. त्याला अपिलाला स्कोप आहे. इथल्या अपिलाची रेमेडी एक्सप्लॉईट झाली तरी न्यायालयाची रेमेडी आहे. ज्या नागरिकांना वापर तोच आहे तरी भरमसाठ घरपट्टी आली त्या प्रत्येक नागरिकाने आमच्यापर्यंत ॲप्रोच व्हायचे आहे. आणि स्पॉट व्हेरीफिकेशन करुन असेल किंवा आणखी काय असेल आपले रेट व्हेरीफाय करुन त्यांच्या असेसमेंट चे व्हेरीफिकेशन करुन देणार आहोत. मा. सेक्रेटरी सरांच्या आदेशानुसार त्यांच्या बैठकीतल्या आदेशानुसार आणि उर्वरीत वसुलीचे काम ते चालू राहील. १०० टक्के वसुलीचे टारगेट पूर्ण कराचे आहे. केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या योजनांच्या रिफॉर्म मध्ये ९०% च्या जास्तीची वसुली हे आपले टारगेट आहे. आणि ते टारगेट आपण पूर्ण करत नाही. जास्तीत जास्त ५० टक्के पूर्ण होत असते. ३१ मार्च पर्यंत आपण शास्ती माफीचे योजना ठेवली आहे. जास्तीत जास्त लोकांनी लाभ घेऊन ती प्रोसेस पूर्ण करायची आहे. आणि आढळलेली गोष्ट म्हणजे जेवढे पण फिल्डवर कामे चालू आहे , रस्त्यांची कामे चालू असतील इतर कुठलीही कामे चालू असतील त्यावर वॉच सर्व इंजिनिअरचा पाहिजे. त्या त्या विभागात नेमलेल्या पावटे यांनी तर विक्रम करुन टाकला आहे. सस्पेंड करायला पाहिजे तुम्हाला. शासनाचे पैसे आहे, लोकांचे सतत फोन येत आहे. मला आश्चर्य होत आहे. कॉंक्रीट रस्तयांवर कसे डांबरीकरण होऊ शकते? आपण बघत नाही आणी मनमानी करायला मोकळे सोडले असा त्याचा अर्थ होतो. शिंदे साहेब सर्व ठेकेंदारांना लेखी सूचना द्या आणि सर्व अभियंतांना लेखी सूचना द्या. साईटवर ते पाहिजे. मी नागरिकांना पण आवाहन करते जिथे कुठे कामे चालू आहे. आणि ती सबस्टॅंडर्ट होत आहे. मनपाचे कॉनटॅक्ट नंबर आहे. माझा नंबर जवळ जवळ सर्वांकडे आहे. मला व्हॉटसॲपला टाका, फोन करुन सांगा. रात्री केलेला फोन सुध्दा मी उचलते करुन सबस्टॅंडर्ड कामे होणार नाही याची दक्षता घ्यावी. मागे पण नागसेन बोरसे यांनी तक्रार केली होती. तिथल्या काही नागरिकांची तक्रार आहे. आता त्या सर्व कामाचे थर्ड पार्टी ऑडीट करायचे ठेकेदार ब्लॅकलिस्ट करायचा. आणि मोठी कामे होत असतांना सर्व अभियंता यांचा तेथे वॉच असला पाहिजे. इथून पुढे असे काही आढळले तर प्रत्येक संबंधीत व्यक्ती कामाला लागेल हे लक्षात ठेवावे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तवास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक १२ दिनांक २३/०१/२०२४**

धुळे महानगरपालिका ड वर्ग महापालिका असून शहराची लोकसंख्या सुमारे ५ लक्ष असून शहराचे क्षेत्रफळ सुमारे १०१.०८ चौ.कि.मी आहे. धुळे शहरात एकूण 19 प्रभाग असून

त्यात विविध शासनाच्या योजना द्वारे सद्यस्थितीत चालू आहेत तसेच राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या हिस्स्यांच्या प्रमाणत देखील काही योजनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच आरोग्य विभागामार्फत देखील स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचे काम देखील सुरु होणार आहेत. सद्यस्थितीत अमृत १.० (अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना), अमृत १.० (मलनिस्सारण योजना टप्पा क्र. १ ), अमृत १.० सुधारित पाणीपुरवठा योजना, अमृत १.० सुधारित मलनिस्सारण योजना टप्प क्र.१ , राज्यस्तरीय नगरोत्थान योजना (सर्व), अमृत २.० (प्रस्तावित )(हद्दवाढ गावांचा पाणीपुरवठा, अमृत २.०(प्रस्तावित) (मलनिस्सारण टप्पा क्र. ०२ ) या योजना मंजूर आहेत.

सद्यस्थितीत मनपाची आर्थिक स्थिती पाहता तसेच मिळणारे उत्पन्न पाहता शासकीय योजनांसाठी लागणारा मनपा हिस्सा भरणे शक्य नाही. वरील सर्व शासकीय योजनांचे कामांचे रु.३४६.६२ कोटी मात्र मनपा हिस्सा आवश्यक आहे.

वरील सर्व कामे हे साधारण पुढील २ ते ३ वर्षात सुरु होऊन पूर्ण होणार आहेत. तसेच या संदर्भात मनपाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता वरील योजनांसाठी मनपाचा हिस्सा भरणे देखील कठीण होणार आहे. तसेच काही देखभाल दुरुस्तीचे कामे नियमित करावे लागतात उदा.लाईट बिल, आस्थापना खर्च इ. त्यामुळे वरील योजना कार्यान्वित करण्यासाठी काही प्रमाणात बँकेकडून लोन उपलब्ध करून घेणे आवश्यक असेल मोठ्या प्रमाणात लोन घेण्यासाठी राष्ट्रीय कृत बँकांना धुळे महानगरपालिकेची credit rating आवश्यक आहे.

या संदर्भात M/s CRISIL हि कंपनी credit rating करणेसाठी भारतातील अग्रअगण्य कंपनी आहे. त्यांनी त्यांच्या प्रोफाईल मध्ये आता पर्यंत १८,००० कंपनीचे rating केले आहे. याबाबत कंपनी व्यवस्थापकांशी चर्चा केली असता त्यांनी ३५० कोटी लोनचे credit rating करण्यासाठी **एकूण रक्कम रु.११,८९,४४०/- मात्रची फी या कंपनी ने कळविली आहे.** त्यानुसार बांधकाम विभागामार्फत प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेची Credit Reating करणेसाठी M/s CRISIL हि संस्था नियुक्ती करणेस व त्यासाठी येणा:या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त झाली.**

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**